महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ व ९ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
ई-मेल-maharashtra.ara@gmail.com वेबसाईट :www.maha-ara.org
ई-मेल-maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org

क्र.न्यायाप्र-१७१९/प्र.क्र.१७७/संकेतस्थळाबाबत सुचना/२०१९/ दिनांक: २५/०१/२०१९

# सुचना/परिपत्रक

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की काही स्थानिक एजन्सी/संस्था हया त्यांच्या मर्जीनुसार काम करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देत आहेत. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेली प्रक्रिया टाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. हॅकिंग करणाऱ्या तसेच अशा प्रकारचे बेशिस्तीचे व बेकायदेशीर वर्तन करणाऱ्या एजन्सी संबंधित कायद्यानुसार दंडनीय आहेत. जी कोणी व्यक्ती/संस्था, नियंत्रक किंवा संबंधित प्राधिकरणाकडून कोणतेही परवाना किंवा डिजीटल सिग्नेचर गैरमार्गाने मिळवण्याचा प्रयत्न करताना आढळून आल्यास अशा एजन्सी संबंधित कायद्यानुसार दंडनिय असेल.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष आणि प्रवेश नियामक प्राधिकरण या कार्यालयांच्या इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड, पुस्तक, नोंदणी, पत्रव्यवहार, माहिती, दस्तऐवज तसेच इतर प्रकाशित सामग्रीचा कोणत्याही हितधारक, व्यक्ती, एजन्सी, संस्था आणि अधिकारी यांनी गोपनियते संदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड, पुस्तक, नोंदणी, पत्रव्यवहार, माहिती, दस्तऐवज तसेच इतर प्रकाशित सामुग्रीसंबंधी माहिती इतर व्यक्तीसमोर उघड केल्यास संबंधित कायद्यानुसार तो दंडनीय अपराध आहे. जो कोणी जाणूनबुजन, प्रकाशित अन्य कोणत्याही फसव्या किंवा बेकायदेशीर हेतूसाठी डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र उपलब्ध करुन देतो तो संबंधित कायद्यानुसार दंडनीय असेल.

वरीलप्रमाणे कोणी हितधारक, व्यक्ती, एजन्सी, संस्था आणि अधिकारी नियमांचे उल्लंघन तसेच बेकायदेशीर वर्तन करत असल्यास असे सर्व संबंधित कायद्याच्या नियमानुसार शिक्षेस पात्र राहील. राज्य सीईटी कक्षाच्या प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील लिंक (Link) सीईटी कक्षाच्या पुर्व परवानगी शिवाय व्यावसायिक/खाजगी संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यास संबंधित संकेतस्थळाविरुध्द दंडात्मक व कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या आदेशानुसार.

सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण
तथा आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई